मौ. खानापूर, ता. वाई, जि. सातारा येथील गा.न.नं. ७/१२ सदरी मे.विशेष भुमी संपादन अधिकारी नंबर चार सातारा यांचे नावे असलेले गट क्र.५९२/२ क्षेत्र १.५७ हे.आर व गट क्र.५९१/४ क्षेत्र १.२५ हे. आर क्षेत्र उप संचालक (पुनर्वसन) तथा जिल्हाधिकारी, सातारा यांचे नावे वर्ग करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. जमिन.३५१७/प्र. क्र.२८३/ज-५ अ
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दि.१३/१०/२०१७

वाचा :- १) जिल्हाधिकारी, सातारा यांचे पत्र क्र.पुनर्व/धोम/कावि-५३/१६, दि.२५/०१/२०१६.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एलक्युएन.३०/२०००/प्र.क्र.६७/अ-२, दि.१२/०३/२००४.
३) सार्वजनिक बांधकामविभागाचे पत्र क्र. साबांज-२०१६/प्र.क्र.८७/मिव्य-१, दि.०९.०१.२०१६ व दि.१०/०२/२०१७.

प्रस्तावना :-

मौ. खानापूर, ता. वाई, जि. सातारा येथील गट क्र.५९२/२ क्षेत्र १.५७ हे. आर व गट क्र.५९१/४ क्षेत्र १.२५ हे. आर असे एकूण २.८२ हे. आर एवढे क्षेत्र कृष्णा नदीवरील पुलाचे भरावासाठी संपादित करण्यात आले होते. सदर क्षेत्र ज्या प्रयोजनार्थ संपादित करण्यात आले होते ते प्रयोजन समाप्त झाले असल्याने या जमिनीचा अन्य सार्वजनिक प्रयोजनार्थ वापर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेले व गा.न.नं. ७/१२ सदरी मे.विशेष भुमी संपादन अधिकारी नंबर चार सातारा यांचे नावे असलेले सदर क्षेत्र उप संचालक (पुनर्वसन) तथा जिल्हाधिकारी, सातारा यांना वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

याप्रकरणी, मौ. खानापूर, ता. वाई, जि. सातारा येथील गट क्र.५९२/२ व गट क्र.५९१/४ मधील जमिन ज्या प्रयोजनार्थ संपादित करण्यात आली होती ते प्रयोजन समाप्त झाले असल्याने या जमिनीची सार्वजनिक बांधकाम विभागास आवश्यकता नसल्याचे नमूद करून सार्वजनिक बांधकाम विभागाने सदरहू जमिन पुनर्वसन विभाग, जि. सातारा यांच्याकडे परत करण्यास हरकत नसल्याचे या विभागास कळविले आहे.

शासन निर्णय :-

सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी केरळ शासन विरूद्ध एम भास्करन् पिल्लाई याप्रकरणी दि.०५/०५/१९९७ रोजी दिलेल्या आदेशात भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतूदीनुसार संपादित केलेली जमीन ज्या प्रयोजनासाठी संपादित केली आहे त्या प्रयोजनासाठी वापरून अतिरीक्त झालेल्या जमिनीचा वापर अन्य " सार्वजनिक प्रयोजनासाठी " करावा असे नमूद आहे. यानुषंगाने भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात निर्गमित करण्यात आलेला संदर्भाधीन शासन निर्णय दि.१२/०३/२००४ मधील तरतूद विचारात घेता, समुचित शासन अशा जमिनीचा अन्य कोणत्याही " सार्वजनिक प्रयोजनार्थ " वापर करू शकेल. सबब, जिल्हाधिकारी (पुनर्वसन), सातारा यांनी मागणी केल्यानुसार "प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन" या " सार्वजनिक प्रयोजनार्थ " सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेले व गा.न.नं. ७/१२ सदरी मे.विशेष भुमी संपादन अधिकारी नंबर चार सातारा यांचे नावे मौ. खानापूर, ता. वाई, जि. सातारा येथील गट क्र.५९२/२ क्षेत्र १.५७ व गट क्र.५९१/४ क्षेत्र १.२५ हे. आर एवढे क्षेत्र पुढील अटींच्या अधीन राहून उप संचालक (पुनर्वसन) तथा जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अटी :-

१) विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.४, सातारा यांचे नावे नोंद असलेले मौ. खानापूर, ता. वाई, जि. सातारा येथील गट क्र.५९२/२ क्षेत्र १.५७ व गट क्र.५९१/४ क्षेत्र १.२५ हे. आर एवढे क्षेत्र उप संचालक (पुनर्वसन), सातारा यांचे नावे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, सातारा यांनी करावी.

२) या शासन निर्णयानुसार " प्रकल्पबाधितांचे पुनर्वसनांतर्गत - खातेदारास पर्यायी जमिन म्हणून वाटप या " सार्वजनिक प्रयोजनार्थ " सदरहू जमिन पुनर्वसन उप विभागास मंजूर करण्यात आली असून, याच प्रयोजनासाठी तीचा वापर करावा.

३) उप संचालक (पुनर्वसन), सातारा यांचे नावे वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्राचा प्रचलित पुनर्वसन अधिनियमातील तरतूदींस अनुसरून वापर करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्यांचा संकेतांक क्र २०१७१०१३१५२५०८३८१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nanasaheb
Rajaram Dhane

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a71698611123263cde9d32423e9bb73044d91ed0cffad3b6267198ee5014159f, serialNumber=6c39e2858150dbdfcfe6cd25ed08adf59f4d2fd8c1ede1730735f604904bf3bb, cn=Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2017.10.31 17:26:10 +05'30'

(ना. रा. ढाणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे स्वीय सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री (महसूल) यांचे स्वीय सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे स्वीय सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६) विभागीय आयुक्त, पुणे.
७) जिल्हाधिकारी, सातारा.
८) उप संचालक (पुनर्वसन), सातारा.
९) उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.४, सातारा.
१०) कक्ष अधिकारी, (मिव्य-१), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
११) कक्ष अधिकारी, (र-४), महसूल व वन विभाग / पुनर्वसन कक्ष, मंत्रालय, मुंबई यांना त्यांची नस्ती क्र.आरपीए.३५१५/३२/प्र.क्र.११७/र-४ च्या संदर्भानुषंगाने.
१२) निवडनस्ती, कार्यासन ज-५ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.